**सरतपास अर्जदारातर्फे श्री. आर. आर. राठी वकील साहेब.**

१३. आता मला माझे पुराव्याचे शपथपत्र दाखविण्यात आले, त्यातील मजकुर माझे विधीज्ञाने मला समजावुन सांगितला व तो खरा व बरोबर आहे व त्यानंतर मी शपथपत्रावर माझी स्वाक्षरी केली आहे. ते शपथपत्र नि. यु—७ वर आहे.

१४. आता मला नि. यु—५ वरील दस्त दाखविण्यात आलेले आहेत. दस्त कं. १ हे माझे नियुक्तिपत्र आहे, सदरचे दस्त न्यायालयाने पडताळणी केलेली आहे. त्यामुळे त्यास **नि. यु—८** देण्यात येते. दस्त कं.२ हे दि. २९/०३/२०२३ चा निलंबन आदेश आहे, सदरचे दस्त न्यायालयाने पडताळणी केलेली आहे. त्यामुळे त्यास **नि. यु—९** देण्यात येते. दस्त कं. ८ हे दि. २०/०२/२०२४ चे अंतिम कारणे दाखवा नोटीस आहे, सदरचे दस्त न्यायालयाने पडताळणी केलेली आहे. त्यामुळे त्यास **नि. यु—१०** देण्यात येते.

**उलटतपास गैरअर्जदारातर्फे श्री. व्ही. व्ही. गावंडे वकीलसाहेब.**

१५. मी गैरअर्जदाराकडे सुरूवातीला सन १९९१ ला शिपाई म्हणून लागलो. त्यानंतर माझी पदोन्नती सन २००६ मध्ये सहायक लिपीक म्हणून झाली. पदोन्नतीनंतर मी परवाना विभागामध्ये कार्यरत होतो. सन २०१६ ते सदर प्रकरण दाखल करेपर्यंत मी कर विभागामध्ये कर लिपीक म्हणून कार्यरत होतो. कर लिपीक म्हणून ज्या लोकांकडून कर देय आहे ते वसुल करण्याची जबाबदारी माझी होती. मी माझे शपथपत्राच्या परिच्छेद कं. ४ मध्ये असे नमुद केलेले आहे की, सदरची घटना दि. २३/०३/२०२३ ची होती. त्या परिच्छेमध्ये मी असे नमुद केले आहे की, श्री हरीष मनोहरलाल चावला, रा. डि—३/१९४, शिवमंदीर जवळ, कच्ची खोली, सिंधी कॅम्प, अकोला येथे राहत होता. त्याचे दुकान हे अंलकार मार्केट, टिळक रोड, अकोला येथे आहे. अलंकाम मार्केट, टिळक रोड, अकोला येथील त्यांच्या मालकीच्या

दुकानाची कर रक्कम ब—याच दिवसापासून भरलेली नव्हती. ज्यांच्याकडून कराची रक्कम घेणे आहे अशा आस्थापनेला मी सदोदित भेटी देत होतो. मी त्यांच्या आस्थापनेला जानेवारी व फेब्रुवारी २०२३ मध्ये कर वसुल करण्यासाठी भेटी दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना त्यांच्या आस्थापनेचा रू. १,५०,०००/— मालमत्ता कर गैरअर्जदाराला देणे बाकी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरील नमुद केलेला कर जास्त असल्यामुळे तो कमी करण्यासाठी माझी व त्याची बोलणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे दुकान त्यांच्या नावे नव्हते व ते दुकान त्यांच्या नावे करण्यासंबंधी बोलणी चालू होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मालमत्ता कर कमी करण्यासाठी व त्यांचे दुकानाची नोंद महानगरपालीकेमध्ये त्यांच्या नावे करण्यासाठी रू. ३०,०००/— मी मागितले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझेविरूध्द रामदास पेठ, पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्ह्याची नोंद झाली आहे. श्री हरीष चावला यांनी माझे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत रामदास पेठ, पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. त्या एफआयआर ची कॉपी मला दिली होती व ती न्यायालयात दाखल केलेली आहे. आता मला न्यायालयात नि. यु—५ खाली एफआयआर ची कॉपी दाखविण्यात आली आहे, ती कॉपी मला मान्य आहे. करीता त्यास **नि. क्रं. यु—११** देण्यात येते. सदरच्या एफआयआर नुसार मला अटक झालेली होती व त्यानंतर जमानतीवर माझी सुटका झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या एफआयआर नुसार मी मागणी रू. ३०,०००/— लाचेची केली होती व तडजोडीनंतर रू. २५,०००/— ठरले होते व ते रू. २५,०००/— देण्याची श्री हरीष चावला यांची इच्छा नव्हती, त्यामुळे सदरचा एफआयआर दाखल करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, दि. २३/०३/२०२३ रोजी लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात मला पकडण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची रक्कम माझे जिन्स पॅन्टच्या डाव्या बाजुच्या मागिल खिश्यातून काढण्यात आली होती. सदरची रेड सर्व पंचा समक्ष करण्यात आली. हे मला माहित नाही की, माझी मागणी संदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक अधिका—यांनी मागणी पडताळणीसाठी पंच नियुक्त करून त्याची सत्यता

पडताळणी केली. हे मला माहित नाही की, माझी लाचेची मागणी सदरील अधिका—यांना सत्यता वाटल्यामुळे त्यांनी दि. २३/०३/२०२३ रोजी माझेवर सापळा रचून लाचेचा मुद्देमाल जप्त केला. सदरची रक्कम जमा करून त्यासंदर्भात पंचनामे करण्यात आले.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, लाचेची रक्कम रू. २०,०००/— मी स्विकारले व त्यापैकी रू. ५०००/— तक्रारदारास परत केलेले आहेत व स्विकारलेली रक्कम ही मी माझे जिन्स पॅन्टच्या डाव्या बाजूच्या मागच्या खिश्यात ठेवली होती. सदर प्रश्नाला तक्रारदारांच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला आहे. सदरचा आक्षेप अंतिम युक्तिवादाच्या वेळी निकाली काढण्यात येईल. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस मी सदरची रक्कम स्विकारली त्यावेळी उपस्थित असलेले पंच यांनी रक्कम स्विकारल्याचा इशारा केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक अधिका—यांनी मला लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले. सदरच्या रेडची बातमी दै. देशोन्नती दि. २४/०३/२०२३ च्या अंकात आली होती. ती बातमी न्यायालयाच्या दस्ताऐवजांमध्ये मी दाखल केलेली आहे, करीता त्यास **नि. यु—१२** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याचे पोलीस निरिक्षक श्री. सचिन सावंत यांनी सदरील घटनेची माहिती पत्र दि. २४/०३/२०२३ रोजी गैरअर्जदाराला एफआयआरच्या कॉपीसह देण्यात आली. करीता त्या पत्रास **नि. क्रं. यु—१३** देण्यात येते. सदरचे पत्र प्राप्त होताच मला गैरअर्जदाराने दि. २९/०३/२०२३ च्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, निलंबनानंतर गैरअर्जदाराने मला दि. ११/०५/२०२३ रोजी दोषारोप पत्र दिले. सदरील दोषारोपपत्र न्यायालयाने पडताळणी केलेले दस्त आहे, करीता त्यास **नि. यु—१४** देण्यात येते. मला दोषारोपपत्रासोबत जोडपत्र १ ते ४ देण्यात आले आहे. तसेच त्यासोबत कागदपत्रेसुध्दा मला पुरविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर आरोपपत्र दि. ११/०५/२०२३ रोजी मला देण्यात आले होते व त्यानुसार १० दिवसात बचावाचे लेखी निवेदन सादर करण्यात यावे असे कळविण्यात आले, त्यानुसार मी लेखी जबाब आरोपपत्राला दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे आरोप मला मान्य असल्याकारणाने मी

त्यांना माझे बचावाचे लेखी निवेदन सादर केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर माझी चौकशी करून त्यासंदर्भात चौकशी अधिका—यांनी अहवाल सादर केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे बचाव निवेदन(अंतिम टाचण) दि. १५/०९/२०२३ रोजी सादर केले. सदरील अंतिम टाचण हे मी दाखल केले आहे व त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकुर माझे सांगण्यानुसार बरोबर आहे. करीता त्यास **नि. यु—१५** देण्यात येते. आता मला माझे नि. कं. यु—१५ मधील परिच्छेद कं. ६ मधील पोर्शन मार्क—ए दाखविण्यात आलेला आहे, तो बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मला अंतिम कारणे दाखवा नोटीस सेवेतून बडतर्फ करण्यासाठी दि. २०/०२/२०२४ ला देण्यात आली आहे व ती नोटीस दि. २१/०२/२०२४ ला मला मिळाली. सदरची नोटीस नि. यु—१० वर आहे. सदरच्या अंतिम कारणे दाखवा नोटीसला मी उत्तर दिले नाही व सदरचे प्रकरण न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाच्या आदेशानुसार मी आजही सेवेमध्ये आहे व सध्या मी ७५ टक्के निर्वाहक भत्ता गैरअर्जदाराकडून घेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद केल्यामुळे मला अंतिम कारणे दाखवा नोटीस कामावरून कमी करण्यासंदर्भात देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे कारण दाखवून खोटे प्रकरण दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**समक्ष**

स्वा/—
**(डी. एस. पाईकराव)**
**न्यायाधिश,**
**कामगार न्यायालय, अकोला.**

**दिनांक:— ०५/०१/२०२६.**